**विशेष दिवाणी दावा क्र. २६/२०१४ मधील नि.१०१ खालील आदेश**
**मे.रतन मेटल्स तर्फे प्रोप्रा. वि. मे.यश एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा.**
**CNR NO. MHST050002252014**

प्रतिवादींनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला "पुरावा बंद" चा आदेश रद्द होवून प्रतिवादी यांना पुन्हा पुरावा देण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. सदरचा दावा वादीने रक्कम वसुलीकरीता दाखल केला आहे. सदरचे प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता आहे. प्रतिवादीतर्फे वटमुखत्यार यांनी नि.८१ वर सरतपास दि.२८.०१.२०२० रोजी दाखल केला आहे. दि.०४.०२.२०२१ रोजी वादीने उलटतपास घेतला नाही, असा आदेश झालेला होता व तद्नंतर नि.८२ वर प्रतिवादीतर्फे पुरावा बंदची पुरसीस दाखल केली होती. अशी वस्तुस्थिती असताना वादीने नि.९५ वर दिलेल्या अर्जावर दि.०४.०७.२०२५ रोजी मे.कोर्टाने सदरचा अर्ज अंशत: मंजुर करुन नि.८१ वरील सरतपास हा प्रतिवादीकरीता ग्राहय धरण्यात येणार नाही असा आदेश झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रतिवादींचा बंद झालेला पुरावा पुन्हा उघडण्यासाठी व प्रतिवादींना पुरावा देण्यास संधी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींना पुरावा देण्यास संधी न मिळाल्यास प्रतिवादींचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादीस पुरावा देण्यास संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. सदर अर्जास वादीतर्फे नि.१०४ ला म्हणणे दाखल करण्यात आले आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींनी स्वत: पुरावा बंद केलेची पुरसीस दाखल केलेली आहे. त्यामुळे आता प्रतिवादींना पुन्हा पुरावा सुरु करता येणार नाही. न्यायाचे दृष्टीने योग्य ते आदेश

करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता आहे. प्रतिवादींचा अर्ज मंजूर झालेस वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. सदर प्रकरण गुणदोषावर निकाली निघणेकरीता प्रतिवादींना संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. उपरोक्त कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आ दे श**

(१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादींविरुध्द झालेला "पुरावा बंद" चा आदेश रद्द होवून प्रतिवादी यांना पुन्हा पुरावा देण्यास परवानगी देण्यात येते.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.12.16 10:41:12 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )

दिनांकः १५.१२.२०२५ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.